# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Local Crime Branch**

**Date of Good Work done** :- **14/01/2022**

**Brief of the work done :-**

मा.पोलीस अधीक्षक श्री. @IPS_Bachchan यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दिनांक 12.01.2022 रोजी वाशिममधील लाखाळा येथील दरोडा प्रकरणातील अनोळखी आरोपीतांचा शिताफीने शोध घेतला व 24 तासात गुन्हा उघडकीस आणला असून पुढील तपास सुरू आहे



कॅमेरा लेन्स

वाशिम : येथील लाखाळा परिसरात दरोड्याचा प्रयत्न झाल्याने परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र पोलिस प्रशासनाने तपासाची चक्रे वेगवान फिरवून २४ तासाच्या आत तीन आरोपिंना गजाआड केले आहे. इतर आरोपींचा शोध सुरू आहे.

## दरोडेखोरांच्या मुसक्या आवळल्या

### लाखाळा परिसरात दरोड्याचा प्रयत्न करणाऱ्या टोळीतील तिघांना अटक

देशोन्नती वृत्तसंकलन...

**वाशिम** ▪ १३ जानेवारी रोजी वाशिम येथील लाखाळा परीसरात राहणाऱ्या किशन शशिकांत देवाणी यांच्या राहत्या घरात घुसुन दरोड्याचा प्रयत्न करणाऱ्या तीन दरोडेखोरांना अटक करण्यात वाशिम पोलिसांना यश आले असुन या प्रकरणातील अन्य आरोपी लवकरच अटक करु.अशी माहीती जिल्हा पोलिस अधिक्षक बच्चनसिंग यांनी पोलिस अधिक्षक कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये दिली.

या संदर्भात अधिक माहीती देतांना बच्चनसिंग यांनी सांगितले की, वाशिमच्या लाखाळा परीसरात किशेन देवाणी हे धान्य आडत व्यापारी राहत असुन त्यांच्या घरी संबंधीत दरोडेखोरांनी ऐवज व रक्कम लुटण्याच्या दृष्टिकोनातुन १३ जानेवारी रोजी सायंकाळी ७ च्या दरम्यान घरात घुसुन घरातील महीलांना धारदार शस्त्राचा धाक दाखवुन घरातील मौल्यवान वस्तु लुटण्याचा प्रयत्न केला. मात्र यावेळी अचानक देवाणी यांच्याकडे दुध देण्यासाठी दुधवाला आला असता संबंधीत दुधवाल्याच्या लक्षात ही बाब आली. त्याच्या सतर्कतेमुळे दरोड्याचा प्रयत्न असफल झाला.कारण दुधवाला देवाणी यांच्या दारात उभा असतांना चारचाकी वाहनात बसलेल्या एका आरोपीने फोन करुन घरात घुसलेल्या दरोडेखोराना बाहेर कोणी तरी आले. अशी माहीती दिली. घराबाहेर लोक जमत आहेत. असे दरोडेखोराना कळताच त्यांनी त्या ठिकाणाहुन बाहेर असलेल्या चारचाकी वाहनातून पोबारा केला.

या प्रकरणाची तक्रार किशन देवाणी यांनी वशिम शहर पोलिसांत दिली.घरातील महीलांनी दरोडेखोर हे पाच ते सहाजण असुन त्यांनी शस्त्राचा धाक दाखवुन घरातील वस्तु लुटण्याचा प्रयत्न केला. तसेच घरातील मोबाईल दरोडेखोरांनी नेल्याचे पोलिसांना सांगितले.शहर पोलिसात अप.क्र.३८/२२ कलम ३९५ भादवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.जिल्हा पोलिस अधिक्षकांनी सदरचा तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सोमनाथ जाधव, तसेच डिवाएसपी सुनिलकुमार पुजारी यांच्याकडे सोपविला.तपास पथकाने गोपनिय माहीतीच्या आधारे अंजनखेडा येथुन लखन उर्फ ईश्वर रामभाऊ पायघन वय ३८, पुंजाजी किसन इढोळे वय ५५ रा. दोडकी,विठ्ठल काशिराम पायघन वय ३० रा. अंजनखेडा यांना ताब्यात घेऊन पोलिसी खाक्या दाखविला असता त्यांनी गुन्हयाची कबुली दिली.यातील आरोपी पुंजाजी इढोळे याच्याकडे रेती वाळुचे दोन टिप्पर असुन त्यांने टिप्पवर शेतीवर अंदाजे ९० लाखांचे कर्ज घेतलेले होते. हे कर्ज फेडण्याकरीता पुंजाजी इढोळे यांने आपल्या साथीदारासह पुसद नाका व लखन पायघन याच्यया धाब्यावर या गुन्हयाचा कट रचला किशन देवाणी या अडत व्यापाऱ्याचा घरात एक दोन कोटी रुपये नगदी मिळतील या करीता देवाणी यांच्या घरावर पाळत ठेऊन दरोड्याची योजना आखली. अशी माहीती पोलिस तपासात उघडकीस आली. सदर कारवाईमध्ये जिल्हा पोलिस अधिक्षक बच्चनसिंग व अपर पोलिस अधिक्षक गोरख भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक सोमनाथ जाधव, सपोनि अतुल मोहनकर, प्रमोद इंगळे, विजय जाधव, पोउपनि पठाण, पोहवा बाळु कंकाळ, सुनिल पवार, गजानन अवगळे, दिपक सोनावणे, किशोर चिंचोळकर, पोना राजेश गिरी, राजेश राठोड, अमोल इंगोले, प्रविण राऊत, गजानन गोटे, राम नागुलकर, पोशी डिंगाबर मोरे, शुंभम चौधरी, सतोष शेणकुडे, निलेश इंगळे, चालक पोका. संदीप डाखोरे, गजानन जाधव, सायबर सेल गोपाल चौधरी, तसेच वाशिम शहर पोलिस पथक यांनी सहभाग नोंदविला.(जि.प्र.)

### २४ तासात आरोपी गजाआड

जिल्हा पोलिस प्रशासनासाठी लाखाळा परीसरातील ही घटना एक चॅलेंज होती. मात्र स्थानिक गुन्हे शाखा पथकाने २४ तासात उकल करुन आरोपी गजाआड केले. लाखाळा परीसरात सायंकाळी ७ च्या सुमारास दरोड्याचा घटनेमुळे परीसरातील नागरीक भयभीत झाले होते.